



दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९४ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शनिवार । १८/०४/२०२६ । पाने - ६




# संसदेत महिला आरक्षण लागू



नवी दिल्ली (वृत्तंसस्था)

देशाच्या राजकारणात ऐतिहासिक बदल घडवून आणणाऱ्या महिला आरक्षण कायद्याची (नारी शक्ती वंदन अधिनियम) अंमलबजावणी आता अधिकृतपणे सुरू झाली आहे. केंद्रीय कायदा मंत्रालयाने काल १६ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरा यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, या कायद्याचा तात्काळ लाभ महिलांना मिळणार नसून तो २०२९ पासून लागू होण्याची शक्यता आहे. या विधेयकावर काल दिवसभर संसदेत चर्चा सुरु होती. या चर्चेनंतर आज यासाठी अंतिम मतदान होणार आहे.

संसदेने सप्टेंबर २०२३ मध्ये नारी शक्ती वंदन अधिनियम (महिला आरक्षण कायदा) मंजूर केला होता. आता सरकारने १६ एप्रिल २०२६ पासून हा कायदा अंमलात आल्याची अधिकृत घोषणा केली आहे. या कायद्यानुसार, भविष्यात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत एक तृतीयांश म्हणजेच ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील.हा कायदा अस्तित्वात आला असला तरी, त्याचा लाभ महिलांना लगेच मिळणार नाही. सरकारी नियमांनुसार, हे आरक्षण २०२७ मध्ये होणारी जनगणना आणि त्यानंतरची मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच लागू होईल. या प्रक्रियेमुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव राहतील, अशी चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे हे आरक्षण २०२९ च्या निवडणुकांपासून लागू होण्याची शक्यता आहे. या कायद्याची अधिसूचना १६ एप्रिल जारी केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. एका बाजूला संसदेत या कायद्यात सुधारणा करण्यावर चर्चा सुरू होती, त्याचवेळी ही अधिसूचना आल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. संसदेत सुरू असलेल्या या चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली.

# भोंदू गडगे बाबावर कायदेशीर कारवाई करणार

## अंनिसवरील आरोप निराधार - अ‍ॅड. रंजना गवांदे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -तालुक्यातील वडगाव पान येथील गडगे बाबांच्या भोंदूगिरीबाबत राज्यभरातून अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे तेथील कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने संगमनेर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली होती. त्याचबरोबर या भोंदू गडगे बाबांसारख्या अनेक बाबांच्या करारनाम्यांचा भांडाफोड अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वारंवार केला आहे. त्यामुळेच या तथाकथित गडगे बाबाने आपल्याच माणसांना हाताशी धरून अंनिसवर खंडणी मागितल्याचा बोगस व मानहानी करणारा आरोप केला आहे. वास्तविक सदर व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या व्यक्तींशी अंनिसचा कुठलाही संबंध नाही. मात्र या व्हिडिओ मुळे अंनिसची बदनामी झाली असून याबाबत गडगे बाबा व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. अशी माहिती अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अ‍ॅड. रंजना गवांदे यांनी दैनिक युवावार्ताशी बोलताना दिली.

तालुक्यातील वडगाव पान येथे तथाकथित दत्तधाम मधील भोंदू गडगे बाबा विरुद्ध अंनिसने आक्रमक भूमिका घेतल्याने व सर्वसामान्य नागरिकांच्या होणाऱ्या फसवणूकीबद्दल या बाबांवर कारवाई करण्यात यावी अशी ठाम भूमिका अंनिसने घेतल्याने या बाबाचे पित्त खवळले. त्यामुळे त्याने आपल्याच माणसांना हाताशी धरून अंनिससह इतर पोलिस अधिकारी यांच्यावर खंडणीचा आरोप करणारा बोगस व्हिडिओ बनवून समाजमाध्यमावर टाकले. प्रत्यक्षात मात्र या व्हिडिओमध्ये खंडणी मागणारे किंवा अंनिसचे नाव घेणारे इसम यांना आपण ओळखत देखील नाही किंवा ते अंनिसचे कार्यकर्ते देखील नाही. तसेच हा संपूर्ण व्हिडिओ जाणिवपूर्वक बनविण्यात



आला असून त्यात वारंवार अंनिस व आपले नाव घेण्यास त्या व्यक्तीला भाग पाडले जात असल्याचे दिसते. तसेच या बाबाने काही जणांना हाताशी धरून आपला फोटो वापरून हे व्हिडिओ सोशल मीडियावर टाकण्यात आले आहे. हा प्रकार कायदेशीर गुन्हा असून याबाबत आपण सदर बाबा व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणार आहोत.

दरम्यान अंनिसने प्रांताधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले होते की, गड़गे बाबांच्या दरबारात लोकांना झौषधे दिली जातात, ते औषधे देणारे डॉक्टर पदवीधारक आहेत का? येणाऱ्या लोकांकडून घेतली जाणारे शुल्क अथवा अन्य स्वरूपातील रक्कम, औषध भांडार, औषध विकणारा, त्या संबंधाने नोंदणी, परवाना या सर्व बाबी तपासणी करून तसा अहवाल आम्हास अवगत व्हावा व गडगे बाबांची भोंदूगिरी बंद होऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने २९ मार्चला जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांना भोंदूंवर कायदेशीर कारवाई होऊन दरबार ताबडतोब बंद व्हावा व अन्य मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्यामुळे याप्रकरणी तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव अ‍ॅड. रंजना गवांदे यांच्यासह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. त्याच्याच भीतीने या बाबाने आपल्यावर व संघटनेवर हे खोटे आरोप केले आहेत. त्याचा आपण तीव्र शब्दात निषेध करतो असे देखील अ‍ॅड. रंजना गवांदे यांनी सांगितले.

**व्हिडीओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा**

# संगमनेरमध्ये शिवसेनेत मोठ्या ‘इनकमिंग’ची चाहूल

## गैरप्रकारांवर आमदार अमोल खताळ यांचा कडक इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेरमध्ये लवकरच शिवसेनेत मोठ्या प्रमाणात ‘इनकमिंग’ होणार असल्याची माहिती समोर आली असून, काही प्रमुख नेत्यांचा प्रवेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर तालुक्यातील विविध गैरप्रकारांवरही त्यांनी कठोर भूमिका घेत प्रशासनाला इशारा दिला.



**शिवसेनेत मोठे प्रवेश लवकरच** - राज्यात महायुती सरकारला मिळालेल्या यशानंतर विकासकामांना वेग आला आहे. त्यामुळे इतर पक्षांतील अनेक पदाधिकारी शिवसेनेकडे वळत आहेत. एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात प्रवेश सुरू असून, संगमनेरमध्येही लवकरच मोठ्या प्रमाणात नेते आणि कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश होणार असल्याचे खताळ यांनी सांगितले. इतर पक्षांतील खासदार किंवा नेते शिवसेनेत येत असतील, तर त्यांचे स्वागतच केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

**वडगाव पान ‘दत्तधाम’ प्रकरणात कारवाईचा इशारा-** वडगाव पान येथील दत्तधाम सरकार येथे कॅन्सर सारख्या आजारांवर उपचार होतात असा दावा करून नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याच्या तक्रारींबाबत आमदार खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करून शोषण केले जात असेल, तर ते सहन केले जाणार नाही. तक्रारदार पुढे आल्यास पोलिसांकडून सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. सोशल मीडियाद्वारे अशा प्रकारांचे मार्केटिंग करणाऱ्यांवरही कारवाई केली जाईल. तसेच दत्तधाममध्ये गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांचीही चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अशोक खरात प्रकरणाचा संदर्भ देताना आ. खताळ म्हणाले की, अशा नीच प्रवृत्तीच्या लोकांवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, असे मत व्यक्त करत समाजात अशा कृत्यांना थारा दिला जाणार नाही, असे खताळ यांनी ठामपणे सांगितले. संगमनेर शहरातील चावडी तलाठी कार्यालयात अधिकृत परवानगीशिवाय एजंट बसून नागरिकांकडून पैसे घेऊन कागदपत्रांवर शिक्के-सही करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

या प्रकरणी संबंधित तलाठी, कर्मचारी आणि एजंटवर कारवाई करण्याचे आदेश प्रांताधिकारी व तहसीलदारांना देण्यात आले आहेत. मनुष्यबळाची कमतरता असल्यास योग्य कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, मात्र नागरिकांची लूट सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

सदर एजंटने आतापर्यंत किती नागरिकांकडून पैसे उकळले, तसेच त्याने किती संपत्ती जमा केली याची सखोल चौकशी केली जाणार आहे. पुढील काळात तो पुन्हा कार्यालयात आढळल्यास किंवा त्याला कोणी अधिकारी -कर्मचारी पाठीशी घालत असल्याचे दिसून आल्यास त्यांच्यावरही गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा आमदार खताळ यांनी दिला.

तलाठी किंवा तहसील कार्यालयात कोणताही एजंट नागरिकांची फसवणूक करत असेल, तर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अशा एजंटांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांनाही सोडले जाणार नाही, असा स्पष्ट संदेश आमदार अमोल खताळ यांनी प्रशासनाला दिला आहे.

# विधानपरिषदेसाठी महाआघाडीत एका जागेसाठी रस्सीखेच सुरू




मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आली आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी नियमित निवडणूक तर एका जागेची पोटनिवडणूक पार पडणार आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आहे. विधान परिषदेच्या १० जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषांगाने महाविकास आघाडीकडीतील काही बड्या नेत्यांची नावे चर्चेत आली आहेत. तर विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ जागा येण्याची शक्यता आहे. विधान परिषदेसाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून उद्धव ठाकरे जाणार की दुसरा उमेदवार देणार? याची चर्चा सुरू असतानाच आता काँग्रेसने देखील हालचाली सुरू केल्याच्या चर्चा आहेत. काँग्रेस पक्षातील काही नेत्यांची नावे देखील विधानपरिषदेसाठी चर्चेत आली हे नेते देखील विधानपरिषदेसाठी इच्छुक असल्याची माहिती आहे.

काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुझफ्फर हुसेन सचिन सावंत, हनमंत पवार, राजेश राठोड यांची नावं विधानपरिषदेसाठी चर्चेत आली आहेत . त्यामुळे आता महाविकास आघाडीला मिळणारी एक जागा नेमकी कोणत्या पक्षाला मिळते याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.


विधान परिषद उमेदवारीसाठी उद्धव ठाकरे महाविकास आघाडीकडून उमेदवार असतील. तर महाविकास आघाडीमध्ये कुठले प्रकारची चर्चा न करता इतर दोन पक्षांकडून उद्धव ठाकरेंच्या नावाला पाठिंबा दिला जाईल. अशा प्रकारची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष त्यासोबतच काँग्रेस पक्षाकडून मांडण्यात आली आहे. मात्र यामध्ये उद्धव ठाकरे विधान परिषदेवर जाण्यास इच्छुक नसतील, तर मग ठाकरेंच्या शिवसेनेकडून विधान परिषदेवर जाण्यासाठी राज्यसभेप्रमाणे अनेक नेत्यांची नावे चर्चेत आहेत.






# राज्यात लवकरच १०० महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू होणार



मुंबई (वृत्तसंस्था)

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत राज्यात युवक-युवतींसाठी महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र प्रथम टप्प्यात शंभर केंद्र सुरू करण्यात येणार आहेत आगामी काळात राज्यात या कौशल्य विकास केंद्रांची एक हजार पर्यंत ही संख्या वाढविणार आहोत. ही योजना मुंबई महापालिका क्षेत्रात ही मुंबई शहर व उपनगर मध्ये राबविण्यात येणार आहे. महानगर पालिकेमार्फत या कौशल्य केंद्रांसाठी जागा उपलब्ध करून देण्याची विनंती आयुक्तांना पत्राद्वारे करण्यात आली आहे अशी माहिती मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेत आयोजित पत्रकारांशी संवाद साधताना कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते.महापालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांचीही भेट त्यांनी घेतली. या भेटीदरम्यान मुंबईच्या विविध समस्यांसह तरुणांच्या रोजगारासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करणे या योजनेत नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणासोबत कौशल्याची सांगड घालण्यात येणार आहे.झोपडपट्टी परिसरातही ही प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. शहरी भागात आवश्यक असलेले कौशल्य शिकविण्यात येतील. पदवी सोबत कौशल्य अवगत असेल तरच रोजगाराच्या संधी अधिक उपलब्ध होतील. हँगिंग गार्डन (फिरोजशहा मेहता गार्डन) येथे ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधेसाठी रॅम्प तयार करणे, सायन येथील 'अम्मान देखनी' संस्थेजवळील डीपी रोडवर झालेले अतिक्रमण हटवून तो रस्ता रहिवाशांसाठी मोकळा करावा, याबाबत मुंबई महापालिका आयुक्तांशी चर्चा करण्यात आली.मुंबईतील पायाभूत सुविधा आणि तरुणांच्या उज्वल भविष्यासाठी महानगरपालिका आणि राज्य सरकार मिळून काम करतील, असा विश्वास यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच पीकविमा भरपाई



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर -यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या पीक नुकसानीपोटी पात्र विमा लाभार्थ्यांना १,२१९.७८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली आहे. प्रामुख्याने सोयाबीन पिकाच्या नुकसानीपोटी मदत मंजूर झाली आहे. नांदेड जिल्ह्याला सर्वाधिक ८०० कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. कापूस आणि तूर पिकांच्या नुकसानीचे आकडेवारी अद्याप अंतिम झाली नाही.

फसलेली पीकविमा योजना योजना यंदाही जैसे-थे ? असे वृत्त लोकसत्तामध्ये गुरुवारी प्रकाशित झाले होते. राज्यात मागील खरीप हंगामात अतिवृष्टी, अवकाळी आणि महापुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन ही पीकविमा योजनेतून शेतकऱ्यांना अद्याप एक रुपयाही मिळाला नसल्याचे समोर आले होते. या वृत्ताची तातडीने दखल घेऊन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी तातडीने विमा भरपाई मंजुरीचे आदेश दिले होते.

त्यानुसार ज्या महसूल मंडळातील पीक कापणी प्रयोग पूर्ण झाले आहेत आणि त्या बाबत तक्रारी नाहीत, असे विमा दावे तातडीने मंजूर करण्यात आले आहेत. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळणार आहे. एकूण ५८ लाख ९० हजार हेक्टर क्षेत्राचा विमा काढण्यात आला होता, त्यात ३६ लाख हेक्टरवरील सोयाबीन पिकाचा समावेश होता.

कापूस आणि तुरीची काढणी फेब्रुवारी महिन्यात होते. त्यामुळे पीक कापणीचे अहवाल अद्याप पूर्ण झाले नाहीत. कापूस आणि तुरीच्या पीक कापणी प्रयोगाचे अहवाल एप्रिलअखेर केंद्र सरकारच्या संकेतस्थळावर अपलोड केले जाणार आहेत, त्यानंतर संबंधित दावे मंजूर होऊन भरपाई रक्कम मंजूर होईल. त्यामुळे कापूस आणि तुर उत्पादक शेतकऱ्यांना आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे.

महसूल मंडलनिहाय पीकविमा दावे मंजूर केले जात आहेत. ज्या महसूल मंडलांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, विमा कंपनीची काही तक्रार नाही, अशा मंडलातील विमा दावे तातडीने मंजूर करून भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. मंजूर १२१९ कोटी रुपयांचे वितरण आठवडाभरात पूर्ण होईल. कापूस आणि तूर उत्पादकांनाही लवकरच भरपाई मिळेल,अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

# आत्मा मालिकला राज्यस्तरीय विज्ञान जथ्था पुरस्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - मुंबई विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यालयास दिला जाणारा राज्यस्तरीय 'विज्ञान जथ्था' पुरस्काराने आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलला सन्मानित करण्यात आले.

आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुल सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये राज्यात प्रथम स्थानावर आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेमध्ये गुरुकुलाचे २६ विदयार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली. त्यामध्ये कृष्णा लोखंडे, श्लोक कदम सुवर्णपदकासह राज्यात प्रथम, आरव नाणेकर, राम जाधव, श्रेयश भवर रौप्य पदकासह राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला. मुंबईतील यशवंतराव नाट्यमंदिरामध्ये डॉ. अशोक नगरकर यांच्या हस्ते सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलास विज्ञान जथ्था पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी डॉ. मधुबाला चिंचाळकर, अच्युतराव माने, आत्मा मालिकचे प्राचार्य निरंजन डांगे, विभागप्रमुख सचिन डांगे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

आत्मा मालिक पॅटर्नचे हे यश आहे. याअंतर्गत अभ्यासक्रमाचे सुक्ष्म नियोजन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, तयारी शिबीराचे आयोजन, नैदानिक चाचण्या, सराव परीक्षा, तज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थी व शिक्षकांचे परीश्रम यामुळे हे यश साकारले असे मत संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी साहेब यांनी व्यक्त केले. विदयार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे विभाग प्रमुख सचिन डांगे, पर्यवेक्षक गणेश रासने, अथर्व फाऊंडेशनचे शिवम तिवारी, शिक्षक प्रियांशू कुमार, हरीश तेली, गौरव कापडणीस, अभिलाषा उन्हाळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्षे, श्रीम मिरा पटेल मॅडम आदींनी अभिनंदन केले.

# क्रेडिट घ्या, पण महिला आरक्षणाला पाठिंबा द्या, मोदींची विरोधकांना ऑफर



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

महिला आरक्षण विधेयकाला राजकीय तराजूत मापू नका. अर्ध्या लोकसंख्येला आपण रोखू शकत नाही. मला याचे राजकीय श्रेय घ्यायचे नाही. त्यामुळे सर्वांनी मिळून हे विधेयक पारित करावे. तुम्हाला हवे तर क्रेडिट तुम्हीच घ्या आणि हे विधेयक मंजूर करा असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत म्हणताना विरोधकांना ऑफरही दिली.

महिलांचे आरक्षण मतदारसंघांच्या फेररचनेशी जोडणाऱ्या नारीशक्ती वंदन घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेण्यासाठी तीन दिवसीय विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात विधेयकावर सखोल चर्चा केली जात आहे. विरोधकांनी या विधेयकावर काही आक्षेप नोंदवले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी लोकसभेत या विधेयकाची भूमिका, विधेयकात काय तरतूद असेल? तसेच या विधेयकामुळे नेमके काय होणार? याबाबत सविस्तर माहिती दिली. या विधेयकाला विरोधकांनी विरोध करू नये, असे आवाहनही त्यांनी विरोधकांना केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, तुम्ही आंदोलन केले तर माझा राजकीय फायदा होईल; तुम्ही नाही केले तर कोणालाच फायदा होणार नाही. उद्या आम्ही तुमचा फोटो प्रसिद्ध करून देऊ. श्रेय घ्या, ज्यांना आपला फोटो प्रसिद्ध करायचा आहे, आम्ही तो सरकारी पैशाने प्रसिद्ध करून देऊ. परंतु हे विधेयक संसदेत पारित व्हायला द्यावे. मी तुम्हाला श्रेयासाठी आगाऊच एक कोरा चेक देत आहे, असे त्यांनी लोकसभेत विरोधकांना सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षणावर सर्व विरोधी पक्षांना सोबत येण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी लोकसभेत नारी शक्ती वंदन विधेयकावर आपले निवेदन देताना सांगितले की, आपल्या देशात महिला आरक्षणावर चर्चा सुरू झाल्यापासून आणि त्यानंतरच्या प्रत्येक निवडणुकीत, देशातील महिलांनी या हक्काला विरोध करणाऱ्यांना माफ केलेले नाही. त्यांनी आपली परिस्थिती आणखीनच बिकट केली आहे. २०२४ च्या निवडणुकीत असे घडले नाही. हे विधेयक सर्वांनी एकमताने मंजूर केल्यामुळे असे घडले नाही. कोणालाही राजकीय फायदा झाला नाही.




या उपक्रमाबद्दल गावचे सरपंच शरदराव आरगडे सांगतात...अंधश्रद्धेच्या काळोखातून विज्ञानाच्या प्रकाशाकडे: एक क्रांती 'जिवंतपणी दहाव्याची'

अंधश्रद्धा अज्ञानातून भीती निर्माण करते, तर विज्ञान ज्ञानाच्या प्रकाशातून सत्य समोर आणते. याच विचाराचा जागर करण्यासाठी मी माझ्या सौंदाळा येथे एक क्रांतिकारी सामाजिक पाऊल उचलले आहे.ते म्हणजे 'जिवंतपणी दहावा'हा अनोखा उपक्रम आयोजित केलेला आहे. मृत्यूच्या भीतीपेक्षा जीवनाचा उत्सव मोठा.

समाजात मृत्यूशी संबंधित अनेक कर्मकांडांबाबत भीती आणि गैरसमज पसरलेले असतात.लहान अंधश्रद्धेतूनच मोठ्या अंधश्रद्धा जन्म घेतात,असे माझे परखड मत आहे आणि ते मी या उपक्रमाद्वारे मांडलेले आहे. दहाव्याच्या विधीवेळी कावळा अन्नाला शिवला तरच मृतात्म्याला शांती मिळते, या पारंपरिक समजुतीला छेद देत, निसर्गाचे नियम आणि विज्ञानाची सांगड घालण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

माणूस जन्माला येतो तेव्हा आनंदाने स्वागत होतं, पण जाताना मात्र मागे राहतो तो फक्त कर्मकांडांचा डोंगर आणि भीतीचा विळखा.आपल्या समाजात मृत्यूनंतरचे ते तेरा दिवस आणि त्यातला 'दहावा' हा विधी अत्यंत भावूक आणि तितकाच भीतीदायक मानला जातो.पण कधी आपण विचार केलाय का,की ज्या माणसाने आयुष्यभर आपल्यासाठी घाम गाळला,त्याचं प्रेम आणि त्याचे विचार आपण जिवंत असताना किती जपले? खरे तर कावळ्याची वाट पाहण्यापेक्षा,माणसाची माया जपा...मृत्यूनंतर अन्नाचं ताट कावळ्याला देण्यापेक्षा,तोच माणूस जिवंत असताना त्याच्या ताटात प्रेमाचा घास भरवणे हा खरा धर्म असे मला वाटते.

माझा हा उपक्रम केवळ कर्मकांडांना विरोध करण्यासाठी नाही,तर माणसाला 'माणूस' म्हणून सन्मान देण्यासाठी आहे.आपण मृत्यूनंतर श्राद्ध करतो,पण जिवंतपणी आई-वडिलांच्या डोळ्यांतील अश्रू पुसतो का?आपण मृत्यूनंतर दानधर्म करतो,पण जिवंतपणी गरजूंना मदत करतो का? मला एकच सांगायचं आहे अंधश्रद्धा ही अज्ञानातून जन्मते.एखादा भोंदू बाबा येऊन आपल्या भीतीचा फायदा घेतो आणि आपण लुबाडले जातो.या अंधारातून बाहेर पडण्यासाठी विज्ञानाचा दिवा हाती धरणे गरजेचे आहे.'जिवंतपणी दहावा' हा उपक्रम आपल्याला हेच सांगतो की- मृत्यू अटळ आहे, पण त्या मृत्यूभोवती विणलेलं भीतीचं जाळं तोडणं आपल्या हातात आहे.

ज्या दिवशी आपण माणसाचा सन्मान त्याच्या हयातीत करायला शिकू,ज्या दिवशी 'दहाव्याच्या' जेवणापेक्षा भुकेलेल्याच्या तृप्तीचा विचार करू,त्या दिवशी खऱ्या अर्थाने अंधश्रद्धेचा काळोख संपेल. सौंदाळा गावातील हे पाऊल केवळ एका गावापुरते मर्यादित न राहता,ती एक विचारांची लाट बनावी.कारण,सत्य साधं असतं,निसर्ग नियमाने चालतो,आणि माणुसकी हाच सर्वात मोठा धर्म असतो.

मृत्यू हे जीवनाचे अंतिम सत्य असले तरी काही व्यक्ती अशा असतात ज्या मृत्यूलाही अर्थ प्राप्त करून देतात.त्यानुसार माझे आजोबा भानुदास मारुती आरगडे यांचे देहदान आम्ही यापूर्वी केलेले आहे,मी देखील हाच एक निर्णय घेतला आहे-माझ्या मृत्यूनंतर माझा देह मेडिकल कॉलेजला दान करण्याचा.

देह जळाला तर राख होईल, पुरला तर माती होईल; पण दान केला तर कुणाचे तरी प्राण वाचवण्याचे साधन होईल. म्हणूनच आजच्या मानवतेच्या या महायज्ञात माझा देहदान करून स्वतःची छोटीशी समिधा अर्पण करत आहे.

**लोकसेवक**
**शरद बाबुराव आरगडे**
**लोकनियुक्त सरपंच सौंदाळा**
**ता.नेवासा जि.अहिल्यानगर**
**मो.नं.९०२१२८७७१७**

## साडी वाटप योजनेचा दुसरा टप्पा सुरू

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : जिल्ह्यातील ८७ हजार अंत्योदय रेशनकार्ड धारकांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्य शासनाच्या साडी वाटप योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात या कुटुंबांना मोफत साडी मिळणार आहे. जिल्हा रेशन पुरवठा विभागाने साड्यांची मागणी नोंदवली असून, एप्रिल अखेर किंवा मे महिन्याच्या सुरुवातीला दुकानांमार्फत याचे वितरण होईल. लग्नसराईच्या काळात या लाभामुळे गरीब कुटुंबांना मोठा आधार मिळणार आहे.

साडी वाटप योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्याचा पुरवठा विभाग आता कामाला लागला आहे. शासनाच्या निर्णयानुसार, पुरवठा विभागाने जिल्ह्यासाठी आवश्यक असलेल्या साड्यांची मागणी नोंदवली आहे. साड्यांचा साठा उपलब्ध होताच, त्याचे वितरण रेशन दुकानांमार्फत पारदर्शक पद्धतीने केले जाणार आहे.

यापूर्वी जिल्ह्यात एकदा साडी वाटप करण्यात आले होते. त्यानंतर आता पुन्हा शासनाने ही योजना निश्चित गरीब राबविण्याचे केल्याने कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या योजनेचा मुख्य उद्देश अत्यंत गरीब असलेल्या अंत्योदय कुटुंबांना सणासुदीच्या किंवा विशेष प्रसंगी नवीन वस्त्र उपलब्ध करून देणे हा आहे.

# आता महाराष्ट्रात कांदा पावडरचे उत्पादन होणार



मुंबई (वृत्तसंस्था)

कांद्याच्या किमतीतील चढ-उतार रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकार एक नवीन पाऊल उचलत आहे. शेतकऱ्यांना होणाऱ्या नुकसानीपासून वाचवण्यासाठी अतिरिक्त उत्पादनाचे कांदा पावडरमध्ये रूपांतर करण्याची योजना आहे.

कांद्याच्या किमतीतील सततच्या चढ-उतारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक नवीन धोरण विकसित केले आहे. या धोरणांतर्गत, बाजारातील संतुलन राखण्यासाठी अतिरिक्त कांद्याचे पावडरमध्ये रूपांतर करण्याची योजना आहे. महाराष्ट्राचे परिचालन मंत्री जयकुमार रावल यांनी या संदर्भात एक प्रस्ताव तयार केला आहे, जो लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला जाईल. मंत्र्यांच्या मते, आखाती प्रदेशातील युद्धसदृश परिस्थितीमुळे कांद्याच्या निर्यातीवर नकारात्मक परिणाम झाला आहे. यामुळे देशांतर्गत बाजारात पुरवठा वाढण्याचा आणि किमती घसरण्याचा धोका निर्माण झाला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे थेट नुकसान होऊ शकते. महाराष्ट्र हे देशातील कांद्याचे प्रमुख उत्पादक राज्य आहे. ही योजना राबवल्यास, अतिरिक्त कांद्याचा अधिक चांगला वापर होईल आणि घसरत्या किमतींमुळे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण होईल. यामुळे कृषी क्षेत्राला स्थैर्य मिळण्यासही मदत होईल.अशा योजनांच्या माध्यमातून कृषी उत्पादनांसाठी संतुलित भाव राखण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. कांदा पावडर उत्पादनाचा हा उपक्रम शेतकरी आणि ग्राहक या दोघांच्याही हितासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकतो.

# खरातचे बेनामी व्यवहारांचे धक्कादायक पुरावे उघड



युवावार्ता (प्रतिनिधी) नाशिक -

नाशिकमधील भोंदूबाबा याच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. अंमलबजावणी संचालनालय आणि आयकर विभागाने केलेल्या संयुक्त धाडीत कोट्यवधी रुपयांच्या बेनामी व्यवहारांचे ठोस पुरावे समोर आले आहेत. फसवणूक आणि खंडणीतून मिळालेला पैसा जमिनींमध्ये गुंतवून मोठे आर्थिक जाळे उभारल्याचा संशय तपासात व्यक्त करण्यात आला आहे.

तपासादरम्यान खरातच्या घरातून मालमत्तेच्या 'कच्च्या नोंदी' असलेली कागदपत्रे जप्त करण्यात आली. अधिकृत नोंदणी टाळून केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर व्यवहार करून अनेक जमिनी स्वतःच्या ताब्यात घेतल्याचे समोर आले आहे. कर चुकवण्यासाठी आणि काळा पैसा पांढरा करण्यासाठी हा मार्ग वापरला जात असल्याचाया धाडीत १० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त झाली आहेत. मनी लॉंड्रिंगसाठी 'शेल कंपन्या' वापरल्याचा संशय असून, त्याद्वारे व्यवहारांची साखळी लपवली गेल्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे. बँक खाते, उऊळ आणि आयकर रिटर्नची सखोल छाननी सुरू आहे.

# निराधारांच्या योजना प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा अव्वल!

## उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान



जिल्हा माहिती कार्यालय-

अहिल्यानगर- जिल्ह्यात सामाजिक विशेष सहाय्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय यश मिळवत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. जिल्ह्यातील १ लाख ३८ हजार लाभार्थ्यांना तब्बल २४८ कोटी ३८ लाख २४ हजार रुपयांचे अनुदान थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे वितरित करण्यात आले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

जिल्ह्यात राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांतील पात्र लाभार्थ्यांचे शंभर टक्के आधार संलग्नीकरण पूर्ण करण्यात आले असून, त्यांच्या खात्यांमध्ये थेट अनुदान जमा करण्याची प्रक्रिया यशस्वीरीत्या राबविण्यात आली आहे. तसेच, दिव्यांग लाभार्थ्यांचे यूडीआयडी कार्ड योजनांशी संलग्न करण्याचे कामही पूर्ण करण्यात आले आहे.

योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणारे जिल्हा समन्वयक रविंद्र ज्ञानदेव घावटे व महसूल सहाय्यक श्रीमती शाजिया सलीम पठाण यांना महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे व बाळासाहेब कोळेकर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार उपस्थित होते.

तालुकास्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोलाचे योगदान देत उद्दिष्ट साध्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. यामध्ये संजय गांधी योजनेचे तहसीलदार शीतलकुमार सावळे, कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत व तालुका समन्वयक श्रीमती अर्चना जायकर, श्रीरामपूरचे नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर व श्रीमती निर्मला नाईक, तसेच अहिल्यानगर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार गणेश भानवसे व तालुका समन्वयक श्रीमती वैष्णवी दुधाळ यांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनाच्या समन्वित प्रयत्नांमुळे निराधार व वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचत असून, पारदर्शक व वेगवान अंमलबजावणीमुळे जिल्ह्याने राज्यात आदर्श निर्माण केला आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग - प्रसुति
• मुळव्याध-भगंदर-फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com




# बालविवाह थांबवा, मुलींचे भविष्य घडवा

## संगमनेर तालुक्यातील सुज्ञ नागरिकांना आवाहन !



बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार, मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय विवाह करणे हा दंडनीय अपराध आहे. बालविवाहामुळे मुलींचे शिक्षण अर्धवट राहते, माता मृत्यूचे प्रमाण वाढते व कुपोषित बालके जन्माला येतात. आपल्या गावात, वाडी-वस्तीत बालविवाह होत असल्यास क्षणाचाही विलंब न करता १०९८ किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला माहिती द्या. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल. चला, आपल्या संगमनेरचा नाव आदर्श तालुका म्हणून करूया.

जनहितार्थ जारी

आवाहन

संरक्षण अधिकारी, महिला व बालविकास विभाग, संगमनेर


# जिल्ह्यात 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन' योजनेला गती

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात सन २०२५-२६ मध्ये एकूण १० हजार ४२१ बालकांना ४ कोटी ५४ लाख ९९ हजार ५०० रुपयांचा थेट आर्थिक लाभ वितरित करण्यात आला आहे. तसेच सन २०२४-२५ मध्ये ७ हजार १२३ बालकांना १९ कोटी २३ लाख २१ हजार रुपयांची मदत देण्यात आली होती. या योजनेमुळे जिल्ह्यातील दुर्बल व संवेदनशील घटकांतील बालकांना मोठा आर्थिक व सामाजिक आधार मिळत आहे.

दिनांक ३० जून २०२३ पासून ही योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असून, अनाथ, निराधार, एक पालक असलेली तसेच गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या पालकांची मुले अशा विविध घटकांतील बालकांचा यात समावेश करण्यात आला आहे. बालकांचे संगोपन सक्षमपणे व्हावे, तसेच त्यांच्या शिक्षण, आरोग्य व पोषणात कोणताही अडथळा येऊ नये, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे लाभाची रक्कम डीबीटी (थेट लाभ हस्तांतरण) पद्धतीने थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. यामुळे पारदर्शकता वाढली असून, लाभ वेळेत मिळण्यास मदत होत आहे. प्रशासकीय प्रक्रियेतील विलंब टाळल्याने गरजू बालकांपर्यंत मदत जलद पोहोचविणे शक्य झाले आहे. योजनेमुळे लाभार्थ्यांना सातत्याने आर्थिक आधार मिळत असून, त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे सुलभ झाले आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या समन्वयाने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविका, बाल विकास प्रकल्प अधिकारी व इतर यंत्रणांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना ही जिल्ह्यातील गरजू व निराधार बालकांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. योजनेची रक्कम डीबीटीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे. त्यामुळे बालकांचे संगोपन, शिक्षण व आरोग्याच्या गरजा पूर्ण होण्यास मोठी मदत होत आहे. योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी व्हावी यासाठी प्रशासन सतत प्रयत्नशील असून, समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविणे हे आमचे प्राधान्य आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलचे सीबीएसई बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, शिस्त, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि सर्वांगीण विकास यांचा उत्कृष्ट संगम साधणाऱ्या पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सीबीएसई बोर्ड परीक्षेत अभूतपूर्व, दैदिप्यमान आणि अभिमानास्पद यश संपादन करत आपल्या शैक्षणिक कार्याची भक्कम छाप उमटवली आहे. विशेष म्हणजे, यावर्षी शाळेच्या पहिल्याच बॅचने बोर्ड परीक्षा दिली असून विद्यार्थ्यांनी मिळवलेला हा निकाल शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेचा, दूरदृष्टीपूर्ण नियोजनाचा जिवंत पुरावा ठरला आहे. या परीक्षेसाठी एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ४०% विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले, ही बाब शाळेच्या उच्च शैक्षणिक दर्जाची साक्ष देणारी आहे. याचबरोबर ८०% विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय प्राविण्य संपादन केले, तर २० विद्यार्थ्यांनी ८० ते ९० टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळवत उत्तम यश मिळवले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ७ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा अधिक गुण मिळवत उत्कृष्टतेचा उच्चांक गाठला, ज्यामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रचीती आली.




या यशामध्ये कु. निवेदिता नव्हाटे (९९.४०%) हिने अत्युत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला असून, तिच्या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, नियोजनबद्ध तयारी आणि चिकाटी यांचा मोठा वाटा आहे. तिच्या पाठोपाठ कु. समृद्धी मिंडे (९९%) हिने द्वितीय क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्रिशा बिबवे (९७.४०%) तिसऱ्या क्रमांकावर असून, मुक्ता गिरी (९७.४०%), अमेय भरितकर (९७.४०%), अक्षरा गुंजाळ (९६.४०%), अनन्या राऊत (९६%), अस्मिता दिघे (९५.८०%), इच्छा गुप्ता (९५.६०%) यांनीही उच्च गुणवत्तेची कामगिरी करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे. तसेच ९०% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विश्वेश वर्मा (९४.६०%), अनुष्का लाड (९४.२०%), कनिष्क काकड (९३.४०%), युगंधरा गाडेकर (९२.६०%), दर्शन गायकवाड (९२.२०%), साईराज गुंजाळ (९२%), कृष्णा वैद्य (९१.४०%), सार्थक मैड (९१%), अदिती गुंजाळ (९०.१६%), संस्कृती पोकळे (९०%), देवांश नवले (९०%) यांचा समावेश असून, या सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध अभ्यास, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

माहिती तंत्रज्ञान विषयात ६ विद्यार्थ्यांनी १००/१०० गुण मिळवले आहेत, तर इंग्रजी विषयात १ विद्यार्थ्याने आणि हिंदी विषयात १ विद्यार्थ्याने १००/१०० गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले आहे.प्राचार्या मीनाक्षी मिश्रा, उपप्राचार्य योगेश आवारी, माध्यमिक समन्वयक शंकरषण मुसमाडे, सागर नेरपगार, इयत्ता दहावीच्या सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण मार्गदर्शन, वैयक्तिक लक्ष आणि प्रेरणा देत त्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षकवृंद तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा निकाल केवळ गुणांपुरता मर्यादित नसून आमच्या शाळेच्या मूल्याधारित आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धतीचे प्रतिबिंब आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेल्या क्षमतेला ओळखून त्याला योग्य दिशा देणे हा आमचा मूलभूत ध्यास आहे. तसेच उपप्राचार्य योगेश आवारी यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यांचा सुंदर समन्वय आहे. आमचा भर केवळ गुणांवर नसून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिस्त, मूल्ये आणि सर्वांगीण विकास घडविण्यावर आहे. पहिल्याच बॅचने दिलेला हा निकाल भविष्यातील आणखी मोठ्या यशाची नांदी आहे. पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरने या यशाच्या माध्यमातून आपल्या शैक्षणिक प्रवासाची दमदार सुरुवात केली असून, भविष्यातही अशाच उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या यशामुळे संगमनेर शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात शाळेने आपले वेगळे आणि ठळक स्थान निर्माण केले आहे.

# राहुरी मतदारसंघात १७ व १८ एप्रिल रोजी गृह मतदान

## ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)- राहुरी विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या टपाली मतदानासाठी मान्य मतदारांसाठी १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी गृह मतदान प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले असून, गरज भासल्यास १९ एप्रिल हा दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. ही प्रक्रिया सकाळी ७ वाजल्यापासून सुरू होणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनुप यादव यांनी दिली.

निवडणूक प्रक्रियेत सर्वांचा सहभाग वाढवण्यासाठी व शारीरिक अडचणींमुळे मतदान केंद्रावर येणे शक्य नसलेल्या मतदारांना सुलभता निर्माण करून देण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या मतदारांनी १२-डी अर्ज भरून या सुविधेची मागणी केली आहे, त्यांनाच गृह मतदानाची सुविधा लागू राहणार आहे.

या प्रक्रियेसाठी नियुक्त प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक शिपाई, एक सूक्ष्म निरीक्षक, एक पोलीस कर्मचारी व एक व्हिडिओग्राफर यांचा समावेश असणार आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व गोपनीय पद्धतीने पार पाडली जाणार असून, नमुना १० भरून उमेदवारांनी नियुक्त केलेले मतदान प्रतिनिधीही यावेळी उपस्थित राहणार आहेत.

विहित नोंदवहीतील पात्र मतदारांनी १७ व १८ एप्रिल रोजी आपल्या निवासस्थानी उपस्थित राहून मतदान प्रक्रियेस सहकार्य करावे. पहिल्या भेटीत मतदार घरी उपलब्ध नसल्यास पथक दुसऱ्यांदा भेट देईल, मात्र त्यानंतर मतदानाची संधी उपलब्ध होणार नाही, असे आवाहनही श्री. यादव यांनी केले आहे.

# महिला सक्षमीकरणाचे नवे पर्व..!

देशाच्या संसदेत १६ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत नारी शक्ती वंदन अधिनियम या ऐतिहासिक विधेयकावर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. याच अधिवेशनात हा अधिनियम मंजूर होण्याची शक्यता आहे. महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाला नवी दिशा देणाऱ्या या महत्त्वपूर्ण घडामोडीच्या पार्श्वभूमीवर, देशातील महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध धोरणे व योजनांचा सर्वंकष आढावा घेणारा हा लेख.... २०२६ सालाकडे वळताना भारताच्या सामाजिक-आर्थिक पटलावर एक क्रांतिकारी स्थित्यंतर अधोरेखित होत आहे. 'महिलांचा विकास' या मर्यादित संकल्पनेकडून 'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास' या दिशेने झालेला भारताचा प्रवास हा केवळ धोरणात्मक बदल नसून तो राष्ट्रनिर्मितीचा नवा पाया आहे. २०१५ मध्ये सुरू झालेल्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या ऐतिहासिक अभियानाने गेल्या दशकात (२०१५-२०२५) लिंगभेदाच्या सामाजिक भिंती उध्वस्त करण्यात मैलाचा दगड गाठला आहे. 'विकसित भारत २०४७' च्या ध्येयप्राप्तीसाठी महिला आता केवळ योजनांच्या लाभार्थी उरल्या नसून, त्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे प्रमुख इंजिन बनल्या आहेत. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा समन्वय आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने 'रणरागिणी' म्हणून जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दांत, जेव्हाजेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असतो, तेव्हातेव्हा सारा देश मतभेदांच्या पलीकडे जाऊन एकजुटीने कृती करतो. या भावनेतून 'नारी शक्ती वंदन अधिनियम' (२०२३) द्वारे महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण सुनिश्चित करणारे ऐतिहासिक पाऊल उचलले गेले.

२०२६ मध्ये कॅबिनेटने या अंमलबजावणीसाठी संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर केल्याने २०२९ च्या निवडणुकांपासून ही आरक्षण व्यवस्था प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. ही केवळ राजकीय प्रतिनिधित्वाची वाढ नाही, तर समता आणि सर्वसमावेशक लोकशाहीची नवी दिशा आहे. कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसाठी सुरक्षित व भयमुक्त वातावरण ही पहिली पूर्वअट असते. जोपर्यंत महिलांना स्वतःच्या सुरक्षिततेची खात्री वाटत नाही, तोपर्यंत त्यांचे 'लखपती दीदी' होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. हे ओळखूनच केंद्र सरकारने 'मिशन शक्ती' अंतर्गत 'संबल' व 'सामर्थ्य' या दोन प्रमुख उपयोजनांना अधिक सामर्थ्य दिले आहे. 'संबल' अंतर्गत 'वन स्टॉप सेंटर' ही यंत्रणा आज हिंसाचारग्रस्त महिलांसाठी एकाच छताखाली वैद्यकीय, कायदेशीर, पोलीस आणि समुपदेशन सेवा पुरवते. महिला हेल्पलाइन (१८१) आणि राष्ट्रीय आपत्कालीन सेवा (११२) मुळे संकटकाळात तात्काळ मदत उपलब्ध होते. 'नारी अदालत' द्वारे स्थानिक पातळीवर किरकोळ वाद आणि हक्कांच्या उल्लंघनाचे निवारण करण्याचे अधिकार महिलांच्या हाती देण्यात आले आहे. 'निर्भया फंड' अंतर्गत इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टम मजबूत करण्यात आले आहे. या धोरणात्मक प्रयत्नांचे फलित म्हणजे २०१४-१५ मध्ये ९१८ असलेले 'जन्मवेळचे लिंग गुणोत्तर' २०२४-२५ पर्यंत ९२९ वर पोहोचले आहे. तसेच संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण ९७.३ टक्क्यांपर्यंत वाढणे, ही केवळ आकडेवारी नसून महिलांच्या जीवनमानात झालेल्या गुणात्मक सुधारणेचा पुरावा आहे. 'जननी सुरक्षा योजना' द्वारे दारिद्र्य रेषेखालील महिलांना संस्थात्मक प्रसूतीसाठी आर्थिक सहाय्य मिळते. ग्रामीण भागातील महिला उद्योजकता ही आज भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा ठरत आहे. 'लखपती दीदी योजना २०२६' अंतर्गत देशातील ३ कोटी महिलांना वार्षिक किमान १ लाख रुपये उत्पन्न मिळवून देण्याचे उद्दिष्ट ग्रामीण अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. स्वयंसाहाय्यता गटांच्या माध्यमातून महिलांना कौशल्य प्रशिक्षण, ड्रोन चालवणे, हस्तकला आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात आहे. 'दीनदयाळ अंत्योदय योजना - (आजीविका)' द्वारे स्वयंसहाय्यता बचतगट स्थापन करून महिलांना स्वरोजगाराची संधी मिळते.



'प्रधानमंत्री मुद्रा योजना' हा मोठा आधार ठरला आहे. 'शिशु', 'किशोर' आणि 'तरुण' या तीन श्रेणींतर्गत १० लाख रुपयांपर्यंतचे विना-तारण भांडवल उपलब्ध करून दिल्याने लाखो महिला उद्योजिका बनल्या आहेत. 'स्टँड-अप इंडिया' योजनेद्वारे अनुसूचित जाती-जमाती आणि महिला उद्योजकांना १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळते. 'महिला शक्ती केंद्रे' आता परिपक्व पायाभूत सुविधा बनली असून, ग्रामीण महिलांमध्ये डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्य आणि 'महिला ई-हाट' द्वारे ऑनलाइन उत्पादन विक्रीची संधी उपलब्ध करून देतात. 'राष्ट्रीय महिला कोष' सूक्ष्म वित्तीय सहाय्य पुरवते.

केवळ उत्पन्न मिळवणे पुरेसे नसून, मिळवलेली संपत्ती सुरक्षित ठेवणे आणि मालमत्तेवर हक्क असणे हे खऱ्या सक्षमीकरणाचे लक्षण आहे. 'महिला सन्मान बचत प्रमाणपत्र' ही योजना ७.५ टक्के आकर्षक व्याजदरासह महिलांमध्ये गुंतवणुकीची शिस्त लावते (२ लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक). 'सुकन्या समृद्धी योजना' १० वर्षांखालील मुलींसाठी उच्च व्याजदर आणि करसवलतीसह दीर्घकालीन बचत सुनिश्चित करते. 'प्रधानमंत्री आवास योजना-शहरी' अंतर्गत घराची मालकी प्रौढ महिला सदस्याच्या नावे किंवा संयुक्त नावे असणे अनिवार्य केल्यामुळे 'मालमत्ता अधिकार क्रांती' झाली आहे. 'प्रधानमंत्री उज्ज्वला २.०' योजनेमुळे बीपीएल कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी कनेक्शन मिळाले, धुरापासून मुक्तता झाली आणि आरोग्य-वेळेची बचत झाली. 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' द्वारे गर्भवती व स्तनदा मातांना पहिल्या प्रसूतीसाठी ५,००० थेट बँक खात्यात मिळते; दुसऱ्या अपत्यावेळी मुलगी झाल्यास वाढीव लाभ आणि मजुरी नुकसानीची भरपाई दिली जाते. शिक्षण हे सक्षमीकरणाचे अंतिम शस्त्र आहे. माध्यमिक स्तरावरील मुलींच्या नावनोंदणी दरात झालेली वाढ (७५.५% वरून ८०.२% पर्यंत) हे भारतातील सुशिक्षित पिढीचे आश्वासक चित्र अधोरेखित करते. 'एकात्मिक बालविकास सेवा' अंगणवाडीद्वारे ०-६ वर्षांच्या मुलींसाठी पोषण, आरोग्य आणि पूर्व-शिक्षण पुरवते. संशोधनाच्या क्षेत्रात महिलांना समान संधी मिळावी यासाठी 'सावित्रीबाई जोतिराव फुले फेलोशिप' ही योजना पथदर्शी ठरली आहे. एकुलत्या एक मुलीसाठी पीएचडी संशोधनासाठी जेआरएफ (३१,०००/-) आणि एसआरएफ (३५,०००/-) माध्यमातून भरीव आर्थिक मदत मिळते. सामान्य प्रवर्गातील महिलांसाठी ४० वर्षे आणि राखीव प्रवर्गासाठी ४५ वर्षे वयोमर्यादा शिथिल केली आहे. विज्ञानापासून सामाजिक शास्त्रांपर्यंत सर्व क्षेत्रांत महिला संशोधक देशाच्या बौद्धिक प्रगतीला नवी दिशा देत आहेत.

२०२३ मध्ये संमत झालेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियम'ने कायदेमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याची ऐतिहासिक संधी निर्माण केली. २०२६ मध्ये या विधेयकाची अंमलबजावणीसाठी कायदेमंडळांच्या पटलावर मंजूर होणार आहे. २०२९ च्या निवडणुकांपासून लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३% आरक्षण प्रत्यक्षात येण्याची दिशा स्पष्ट झाली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनानुसार, महिलांसाठी जे पाऊल उचलले जात आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी सर्व पक्ष एकत्र यावेत. हा निर्णय केवळ राजकीय प्रतिनिधित्व वाढवणारा नाही, तर निर्णयप्रक्रियेत महिलांचा अनुभव आणि दृष्टिकोन जोडून प्रशासनाची गुणवत्ता वाढवणारा आहे. २०२६ मधील महिला सक्षमीकरणाचे हे संपूर्ण चित्र सुरक्षितता (मिशन शक्ती), आर्थिक स्वावलंबन (लखपती दीदी, मुद्रा, स्टँड-अप इंडिया), मालमत्ता अधिकार (महिला सन्मान बचत प्रमाणपत्र, प्रधानमंत्री आवास योजना, उज्ज्वला), उच्च शिक्षण आणि राजकीय प्रतिनिधित्व (नारी शक्ती वंदन) या 'पंचसूत्री'वर आधारलेले आहे. सरकारी योजना आता केवळ कागदावर मर्यादित न राहता ते एक राष्ट्रव्यापी 'जनआंदोलन' झाले आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' पासून सुरू झालेला हा प्रवास 'लखपती दीदी', 'महिला संशोधक' आणि 'महिला खासदार' या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. जेव्हा एखादी स्त्री आत्मनिर्भर होते, तेव्हा ती केवळ स्वतःचे कुटुंबच नाही, तर संपूर्ण समाजाचा आणि राष्ट्राचा विकास साधते. २०२६ हे वर्ष भारताच्या आत्मनिर्भरतेचे सुवर्णवर्ष ठरेल, यात शंका नाही, कारण आजची भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने समर्थ झाली आहे. आता गरज आहे ती या सुवर्णसंधींचा लाभ घेऊन प्रत्येक महिलेने आपल्या स्वप्नांना क्षितिज देण्याची!

**– सुरेश पाटील,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी,
अहिल्यानगर

## संपादकीय...

# अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची अंमलबजावणी कमकुवत का?

महाराष्ट्राने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल टाकत जादूटोणा आणि अमानुष प्रथांविरोधी कायदा अस्तित्वात आणला, तेव्हा हा समाज परिवर्तनाचा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. विज्ञाननिष्ठ विचारांना चालना देणे, भोंदूगिरीला आळा घालणे आणि सामान्य नागरिकांचे शोषण थांबवणे हा या कायद्यामागील मुख्य उद्देश होता. मात्र, कायदा अस्तित्वात असूनही प्रत्यक्षात अंधश्रद्धेचे प्रकार कमी होण्याऐवजी अनेक ठिकाणी ते अधिक बळावत असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे अंमलबजावणी का कमकुवत पडते, हा प्रश्न गंभीरपणे विचारात घेण्याची गरज निर्माण झाली आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीतील पहिली आणि सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे समाजातील खोलवर रुजलेली अंधश्रद्धा. अनेक लोक आजही भोंदू बाबा, चमत्कार आणि दैवी शक्तींवर आंधळा विश्वास ठेवतात. शिक्षणाचा प्रसार झाला असला, तरी वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात पुरेशा प्रमाणात रुजलेला नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित झालेली नसल्यामुळे लोक सहजपणे फसवले जातात. अशा परिस्थितीत कायद्याची अंमलबजावणी करताना प्रशासनालाच अनेकदा सामाजिक विरोधाचा सामना करावा लागतो. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे तक्रार करण्याची भीती. अनेक ठिकाणी भोंदू बाबांविरुद्ध लोकांना माहिती असते, परंतु ते पुढे येऊन तक्रार करण्यास तयार नसतात. कारण अशा व्यक्तींचा स्थानिक पातळीवर प्रभाव असतो, त्यांची दहशत असते किंवा सामाजिक बहिष्काराची भीती वाटते. काही वेळा पीडित व्यक्ती स्वतःच त्या भोंदूच्या प्रभावाखाली असल्याने त्याला गुन्हेगार मानण्यास तयार नसते. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली प्राथमिक माहितीच प्रशासनापर्यंत पोहोचत नाही. तिसरी अडचण म्हणजे पोलिस यंत्रणेची भूमिका. कायद्याने पोलिसांना स्वतःहून दखल घेण्याचा अधिकार दिला असला, तरी प्रत्यक्षात अनेक वेळा पोलिसांकडून सक्रियता दिसून येत नाही. काही ठिकाणी पोलिसांमध्येही अंधश्रद्धेचा प्रभाव असतो किंवा अशा प्रकरणांकडे गांभीर्याने पाहण्याची मानसिकता नसते. त्यामुळे तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते किंवा कारवाई उशिरा होते. यामुळे भोंदूगिरी करणाऱ्यांचे मनोबल वाढते. याशिवाय राजकीय आणि सामाजिक दबावही या अंमलबजावणीवर परिणाम करतो. काही भोंदू बाबा किंवा तथाकथित धार्मिक व्यक्ती यांना स्थानिक राजकीय पाठबळ मिळत असल्याचे अनेकदा दिसून येते. अशा वेळी प्रशासनावर दबाव येतो आणि कारवाई टाळली जाते. समाजातील काही घटकही धार्मिक भावना दुखावल्या जातील या भीतीने अशा कारवायांना विरोध करतात. त्यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे कठीण होते. माध्यमांची भूमिकाही येथे निर्णायक ठरते. काही माध्यमे भोंदूगिरीचा पर्दाफाश करतात, परंतु काही वेळा प्रसिद्धीसाठी अशा व्यक्तींना व्यासपीठ दिले जाते. यामुळे त्यांच्या प्रभावात वाढ होते. समाजमाध्यमांच्या युगात तर ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे. बनावट दावे, चमत्कारांचे व्हिडिओ आणि खोट्या यशकथा मोठ्या प्रमाणावर प्रसारित केल्या जातात. त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण होतो आणि अंधश्रद्धेला खतपाणी मिळते. या सगळ्या पार्श्वभूमीवर केवळ कायदा असणे पुरेसे नाही, तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्वप्रथम समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे आहे. शिक्षण व्यवस्थेतून विवेक, तर्कशुद्ध विचार आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. अंधश्रद्धेविरोधात काम करणाऱ्या संस्थांना अधिक बळकटी देणे आणि त्यांच्या प्रयत्नांना सरकारी पाठबळ देणे आवश्यक आहे. पोलिस आणि प्रशासनाला या कायद्याबाबत विशेष प्रशिक्षण देणे, त्यांची संवेदनशीलता वाढवणे आणि जबाबदारी निश्चित करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तक्रारदारांना संरक्षण देण्याची व्यवस्था निर्माण केली तर लोक अधिक धाडसाने पुढे येऊ शकतील. तसेच दोषींवर कठोर आणि त्वरित कारवाई झाल्यास समाजात एक स्पष्ट संदेश जाईल. अखेर, अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा हा केवळ कायद्याचा नाही, तर तो सामाजिक परिवर्तनाचा लढा आहे. प्रत्येकाने स्वतःच्या विचारांची चिकित्सा करून विवेकाने वागण्याची गरज आहे. श्रद्धा ठेवताना तिच्यामागे तर्क असावा, अन्यथा ती अंधश्रद्धा बनते.

# सशस्त्र दलात अधिकारी पदासाठी पूर्वप्रशिक्षण संधी

## पूर्वतयारीसाठी २५ एप्रिल रोजी मुलाखत

अहिल्यानगर-

(जिल्हा माहिती कार्यालय)-

भारतीय सशस्त्र दलात अधिकारी पदाच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांना 'एसएसबी' मुलाखतीची पूर्वतयारी करून घेता यावी, यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे दि. ४ ते २३ मे २०२६ या कालावधीत 'एसएसबी कोर्स क्रमांक ६६' आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षणासाठी निवडल्या जाणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना निवास व भोजनाची सोय विनामूल्य उपलब्ध करून दिली जाणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी निवडीसाठी दि. २५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर येथे मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी केले.

निवडीसाठी उमेदवारांनी मुलाखतीस येताना सैनिक कल्याण विभागाच्या संकेतस्थळावरून 'एसएसबी-६६' कोर्सचा अर्ज डाउनलोड करून तो पूर्णपणे भरावा. तसेच अर्जाची प्रिंट व संबंधित मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

उमेदवाराने सीडीएसई-यूपीएससी किंवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी व ते एसएसबी मुलाखतीसाठी पात्र असावेत. तसेच एनसीसी स्पेशल एंट्री, टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स किंवा विद्यापीठ प्रवेश योजना अंतर्गत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांकडे एसएसबीचे कॉल लेटर असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी उमेदवारांनी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे प्रत्यक्ष भेट द्यावी किंवा training.pctcnashikgmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा. तसेच ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक ९१५६०७३३०६ वरही माहिती उपलब्ध आहे.

# मतदारसंघांचे सीमांकन ही भारताची फसवणूक - जितेंद्र आव्हाड

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केंद्र सरकारने आणलेल्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे संपूर्ण भारताची फसवणूक होणार असल्याचा दावा केला आहे. प्रस्तुत विधेयकामुळे दक्षिण भारतातील राज्यांचे अधिकार संपुष्टात येतील. सोबतच महाराष्ट्राचेही प्रचंड नुकसान होईल, असे ते म्हणालेत.

केंद्र सरकारने लोकसभेच्या पटलावर महिला आरक्षण व सीमांकनाशी संबंधित ३ विधेयक मांडलेत. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत आरोप - प्रत्यारोपांच्या जोरदार फैरी झडत आहेत. सत्ताधारी या विधेयकांचे फायदे पटवून देत आहेत. तर विरोधक हे विधेयक कसे नुकसानकारक आहे? यावर आपली भूमिका मांडत आहेत.

## महाराष्ट्र शासन

### सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

### उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर

**यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर**

ई-मेल आय डी -: dr_sangmner@rediffmail.com

जा.क्र वि-१/अमृत पत/अपसेट प्राईज/ सुनावणी नोटीस/सन २०२६ — दिनांक १६/०४/२०२६

**-: जाहीर समन्स :-**

विशेष वसुली व विक्री अधिकारी, अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या, अहमदनगर यांनी **अमृत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. ता.संगमनेर जि. अहिल्यानगर** या संस्थेचे खालील कर्जदार व जामीनदार यांच्या कर्जाच्या थकबाकीपोटी जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत अपसेट प्राईज ठरवून मिळणेबाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेले आहे.

त्याअनुषंगाने **अमृत ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. ता.संगमनेर** या संस्थेची थकबाकी रक्कम वसुली होईपर्यंत होणारे व्याज व वसुली खर्च हे थकीत झाल्याने वसुली व विक्री अधिकारी यांनी जप्त केलेली स्थावर मालमत्ता खालील तपशिला प्रमाणे जाहिर लिलावाने विक्री करणेसाठी अपसेट प्राईज ठरविणेसाठी दिनांक २१/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही **उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, नवीत्त नगर रोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर** येथे हजर रहावे व अर्जदार संस्थेने दाखल केलेल्या प्रस्तावाबाबत तुमचे म्हणणे सादर करावे.

सदर प्रकरणी आपण उपस्थित राहुत आपले लेखी वा तोंडी म्हणणे सादर करावे. सुनावणीस उपस्थित न राहिल्यास अथवा आपले म्हणणे सादर न केल्यास आपले काहीही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन अपसेट प्राईज मंजुरीबाबत पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | मालमत्ता धारकाचे नाव | गावाचे नाव | गट नं./ मिळकत नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार | मान्यताप्राप्त मुल्यांकन यांचेकडील मुल्यकन | शासकीय मुल्यांकन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार श्री. शशिकांत पाराजी दिघे करिता जामीनदार श्री. जगन्नाथ शहाजी दिघे यांची मिळकत | रा. जोर्वे, ता. संगमनेर | ३४९/३ पैकी | ०.६१ | ३.२० | २३,१८,०००/- | ९,४४,३००/ |
| २ | कर्जदार श्री. शशिकांत पाराजी दिघे करिता जामीनदार श्री. शांताराम किसन दिघे यांची मिळकत | रा. जोर्वे, ता. संगमनेर | ३७९/२ पैकी | ०.६३ | २.९५ | २५,६०,०००/- | ९,१२,७००/ |
| ३ | कर्जदार श्री. अशोक आनंदा जाधव यांचे कर्जा करिता जामीनदार १, श्री. जगन्नाथ शहाजी दिघे यांची मिळकत | रा. जोर्वे, ता. संगमनेर | ५० पैकी | ०.८३ | १.४० | १३,१५,१००/- | ३८,३८,०००/ |
| ४ | कर्जदार श्री.अशोक आनंदा जाधव करिता जामीनदार २, श्री. अरुण आबासाहेब थोरात यांची मिळकत | रा. जोर्वे, ता. संगमनेर | २४२/१ पैकी | ०.५५ | १.८२ | ७,८४,३००/- | २२,००,०००/ |

-कर्जदार व जामीनदार कळविण्यात येते की, मान्यताप्राप्त यांनी केलेले मुल्यांकन आपणास कमी आहे असे वाटत असल्यास आपण शासनमान्य खाजगी मुल्यांककाकडुन वर उल्लेख केलेल्या मालमत्तेचे मुल्यांकन करुन सुनावणीचे वेळी या कार्यालयास दाखल सादर करावा.

ही नोटीस आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

**(संतोष कोरे)**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, संगमनेर**


## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**We Are Hiring** SANGAMNER
Marketing Team

**SLH Tax Advisors Pvt Ltd**

- **Marketing Manager - 1** (25k to 50k+ Incentive)
- **Marketing Executive - 5** (20k to 35k + Incentive)
- **Digital Marketing - 1** (15k to 25k + Incentive)
- **Telecaller (Female) - 1** (15k to 20k + Incentive)



Salary + Incentives
Fast Growth Opportunity

Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner

**Call/WhatsApp- 7264804000**

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट - १ (महिला)
वेळ - सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता - तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**पाहिजेत**
अनुभवी स्त्री/ पुरुष
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता - मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग - १ जागा
दुकानकामासाठी - ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण- जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**गाळा विकणे आहे**
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**रॅक विकणे आहे**
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर... आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
**साई मंगल लॉन्स**
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता- समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क- प्रताप गोडगे
9890924380

READ E- NEWS ON Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM daily_yuvavarta

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

WE ARE HIRING
JOIN OUR TEAM
CorelDRAW Ps Ai Id



GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२



टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची




MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४
वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# उद्योजक गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- तौरल इंडिया, ही ॲल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी, यांचा समावेश जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमध्ये करण्यात आला आहे. या माध्यमातून तौरल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे.

ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन ॲल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित 'थोनी अलुटेक' या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे. प्रा. व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबत महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी यातून मिळते. भरत गीते म्हणाले, हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये केस स्टडी म्हणून निवड होणे हा आमच्यासाठी

अत्यंत अभिमानाचा आणि नम्र करणारा क्षण आहे. आमचा प्रवास मूलभूत तत्त्वांवर आधारित असून, मर्यादांवर मात करत भारतीय उत्पादन जागतिक दर्जाचे बनू शकते, हे सिध्द करण्याचा आहे. योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि भागीदारी यांच्या आधारे भारतासाठी आणि जगासाठी उच्च गुणवत्तेचे, प्रिसिजन-आधारित अभियांत्रिकी उपाय आणि टिकाऊ उत्पादन मूल्य निर्माण करता येते, हा आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. हार्वर्ड बिझनेस स्कूलची ही केस स्टडी मुंबई येथे उद्योग, धोरण आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमात सादर करण्यात आली.

# स्त्री शिक्षणाची सुरुवात घरातून करून फुलेंनी नवा आदर्श निर्माण केला - प्राचार्य वडीतके

आश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)-

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी सुरुवात आपल्या घरातून केली आणि समाजासाठी एक नवीन आदर्श रचला. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निवारण आणि सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी समाजाला नवी दिशा दिली, असे प्रतिपादन प्राचार्य डी. के. वडीतके यांनी केले. आधुनिक भारताचे शिल्पकार व थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या आश्वी इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राचार्य वडीतके बोलत होते.

पुण्यातील भिडेवाडा येथे १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू करून फुलेंनी स्त्री शिक्षणाचा भक्कम पाया रचला. त्या काळातील सामाजिक बंधने आणि विरोध झुगारून त्यांनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित केला. त्यांच्या कार्यामुळे समाजात समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांची जाणीव निर्माण झाली, असेही प्राचार्य वडीतके यांनी यावेळी




सांगितले. पर्यवेक्षक डी. पी. चव्हाण म्हणाले की महात्मा फुले यांच्या कार्यातून आपल्याला समाजसेवा आणि समानतेचे महत्त्व समजते. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण शिक्षण, समता आणि न्याय या मूल्यांसाठी काम करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर भाषणे सादर केली. तसेच त्यांच्या सामाजिक कार्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व प्रेरणा निर्माण झाली.

या प्रसंगी प्राचार्य डी. के. वडीतके, पर्यवेक्षक डी. पी. चव्हाण यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रमेश थेटे, सुवर्णा वाकचौरे, बी. एम. सहाणे, भारती बागुल, मोहन घिगे, राजेंद्र बर्डे, हरिभाऊ कोकाटे, महारुद्र तांबे, अनिता गाडे, शिल्पा आळेकर, रुपाली घुले, उषा घिगे, वैशाली आव्हाड, सखाहरी कचरे, गोरक्षनाथ आंबेकर, मनीषा वायळ, मीरा जंगले, अविनाश जोर्वेकर, योगेश रुपवते, प्रशांत वाळुंज, ज्योती पाटील, किशोर उंबरकर, प्रज्ञा मुंन्तोडे आदी उपस्थित होते.

# 'व्हीआयपी दर्शन' च्या नावाखाली भाविकांची लूट



युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - त्र्यंबकेश्वर मंदिरात 'व्हीआयपी पेड दर्शन'च्या नावाखाली भाविकांची आर्थिक लूट करणाऱ्या प्रकरणात प्रक्षादायक तपशील समोर येत आहेत. विश्वस्त पुरुषोत्तम कडलग आणि त्याच्या पुतण्यांनी या रॅकेटच्या माध्यमातून कोट्यवधींची माया जमविल्याची शक्यता व्यक्त होत असून, या गैरव्यवहाराच्या तपासासाठी 'एसआयटी'ने बँकांकडे धाव घेतली.

एसआयटी प्रमुख महेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कडलग काका-पुतण्यांच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू केली असून, संशयास्पद उलाढालींची छाननी केली जात आहे. रोखीपुरतेच व्यवहार मर्यादित होते की डिजिटल माध्यमातूनही पैसा फिरवला गेला, याचा उलगडा बँक खात्यांच्या विश्लेषणातून होणार आहे. त्र्यंबकेश्वर मंदिरात लाखो भाविक दर्शनासाठी येतात, गर्दीचा गैरफायदा घेत कडलग आणि त्याच्या पुतण्याने 'व्हीआयपी दर्शन'च्या नावाखाली प्रत्येकी सुमारे तीन हजार रुपये आकारून भाविकांची लूट केली. या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैसा उभारला गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे या 'काळ्या बाजारा'त ८४ टक्के कमिशन आकारले जात असल्याची माहिती तपासात पुढे येत आहे. त्र्यंबकेश्वर मंदिरात 'व्हीआयपी पेड दर्शन'च्या नावाखाली लूट झालेल्या भाविकांनी पुढे येऊन त्र्यंबकेश्वर पोलिस ठाणे किंवा एसआयटीकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन एसआयटी प्रमुख तथा वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश कुलकर्णी यांनी केले आहे.

# श्री श्री रविशंकर विद्या मंदिरचा दहावीचा १००% निकाल

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सुमेरु एज्युकेशन सोसायटी संचलित श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, संगमनेर शाळेने दहावीच्या परीक्षेत उत्कृष्ट यश संपादन करत १००% निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणपद्धतीचा आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचा हा यशस्वी परिणाम मानला जात आहे. यंदाच्या निकालात हृद्या दिनेश सोमाणी हिने ९६.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे तनिष्क गाडे (९६.४०%) व श्लोक कासट (९६.००%) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच वेदांत गाडे (९४.२०%), अदिती सोमाणी (९३.४०%), वैभवी हासे (९३.००%), शाल्मी शाह (९२.००%) आणि वेदांत गायकवाड (९२.००%) यांनीही उच्च गुणवत्तेचे प्रदर्शन करत शाळेच्या यशात मोलाची भर घातली आहे.

उत्कर्ष शिंदे (९१.२०%), आदित्य पवार (९१.००%) आणि श्रावणी भांड (९०.६०%) यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवळे आहे. एकूण ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक तर २२ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. वेदांत गाडे यांनी इंग्रजी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले असून, वेदांत




गायकवाड याने मराठी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले , माहिती तंत्रज्ञान विषयात हृद्या सोमाणी, तनिष्क गाडे आणि यतिराज थोरात यांनीही १०० पैकी १०० गुण मिळवून आपली उत्कृष्ट क्षमता सिद्ध केली आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य हे त्रिसूत्री घटक महत्त्वाचे ठरले आहेत. शाळेत वर्षभर घेतल्या जाणाऱ्या नियमित सराव परीक्षा, पुनरावृत्ती सत्रे, विषयानुसार विशेष मार्गदर्शन वर्ग तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीवर ठेवलेले वैयक्तिक लक्ष यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. शाळेत घेतल्या जाणाऱ्या मूल्यशिक्षण, ध्यान, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर सकारात्मक परिणाम झाल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थी केवळ शैक्षणिकदृष्ट्या नव्हे तर मानसिकदृष्ट्याही सक्षम झाले आहेत.

शाळेच्या अध्यक्षा स्वाती शहा, सचिव समीर शहा, मुख्याध्यापिका तसेच उपमुख्याध्यापिका ज्योतीमया चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व शिक्षकवर्ग व वर्गशिक्षिका - संगीता हासे, आशालता दातिर, शुभम कडलग, अविनाश सुर्वे, सोनाली कोकणे यांनी विद्यार्थ्यांच्या यशात मोलाचे योगदान दिले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही पुढील काळातही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास कटिबद्ध राहील, असा विश्वास व्यक्त केला. पालकांनीही शाळेच्या या यशाबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षकांचे आभार मानले.

# स्ट्रॉबेरी स्कूलची दैदीप्यमान निकालाची परंपरा कायम

## दहावी सीबीएसई बोर्डाचा शंभर टक्के निकाल




संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

येथील श्री व्यंकटेश एज्युकेशन सोसायटी संचलित स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल ही सीबीएसई बोर्डाशी संलग्न असून, दहावी बोर्ड परीक्षेत दैदीप्यमान यश मिळबत् आपल्या यशाची परंपरा कायम ठेवली.

यामध्ये स्वरा स्वरा सुवर्णा बाळासाहेब मेहेत्रे वे स्वरूपा दीपिका योगेश थोरात यांनी ९७.२० टक्के गुण मिळवून स्कूलमध्ये पहिला क्रमांक तर सामर्थ्य संज्योत अरविंद वैद्य याने ९६.८० टक्के गुण मिळवत

दुसरा क्रमांक पटकावला आणि नमिता ज्योती नितीन दिघे हिने ९६.४० टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला. सर्व विद्यार्थ्यांपैकी एकूण १८ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले तर ३१ विद्यार्थांनी ८० टक्क्यांपर्यंत गुण मिळवत शाळेचे नाव अव्वलस्थानी नेऊन ठेवले. स्कूलची ही बारावी तुकडी स्वरूपा, दीपिका योगेश थोरात असून १०० टक्के निकालाची परंपरो परंपरो विद्यार्थ्यांनी कायम ठेवली. मागील वर्षीप्रमाणे यंदाही

या विद्यार्थिनीने बँकिंग विषयात १०० पैकी १०० मुण मिळवत विषयनिहाय गुणवत्ता कायम राखली तसेच ५ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयात १०० पैकी ९९ गुण संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल समाजातील सर्वच घटकांमधून त्याची प्रशंसा होत आहे.

या यशाबद्दल शाळेच्या संस्थापिका डॉ. संज्योत वैद्य, संस्थेचे सचिव अरविंद वैद्य, उपाध्यक्ष अजित काकडे, संस्थेचे व शाळा समितीचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य रमेश दिघे, उपप्राचार्या रीना सूर्यवंशी, समन्वयिका मनीषा वाकचौरे व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. लवकरच या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार समारंभ आयोजित करण्यात येईल असे संस्थेच्या संस्थापिका यांनी सांगितले.

# संसदेत महिला...(पान १ वरुन)

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्री किरेन रिजिजू यांनी हा मुद्दा राजकीय नसून देशाच्या विकासाचा आहे. सरकारला याचे श्रेय नको आहे, तर महिलांना त्यांचे हक्क मिळवून द्यायचे आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनीही दक्षिण भारतातील आरक्षणाबाबतच्या शंका दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. हा देश महिला शक्तीच्या हेतूंवर लक्ष ठेवून आहे. त्यामुळे या मुद्द्याला राजकीय तराजूत तोलू नका, असे पंतप्रधानांनी म्हटले. तर दुसरीकडे, काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी यांनी सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी या विधेयकाच्या मसुद्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सरकार जनगणनेच्या नावाखाली महिलांची दिशाभूल करत आहे. आम्ही आरक्षणाच्या बाजूने आहोत, परंतु या प्रक्रियेत राजकारणाचा वास येत असून, निवडणुका जिंकण्यासाठी हे पाऊल उचलले जात आहे, असा आरोप त्यांनी केला. दरम्यान अधिसूचना जारी करण्याच्या वेळेवर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सरकारी अधिकार्यांनी तांत्रिक कारणास्तव ही अधिसूचना जारी केल्याचे स्पष्ट केले आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी या विधेयकाबाबत दक्षिणेकडील राज्यांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच महिलांना त्यांचे हक्क मिळवून देणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे त्यांनी म्हटले आहे. आता आज दुपारी ४ वाजता संसदेत महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर मतदान होणार आहे. या निर्णयामुळे भविष्यातील राजकारणाचे स्वरूप पूर्णपणे बदलणार आहे.

# स्वानुभव नमामि देवी नर्मदे... | भाग - ३

प्रत्येक वर्षी चैत्र महिना चालू झाला की नर्मदा उत्तरवाहिनी परिक्रमा चालू होते. ही परिक्रमा महिनाभर चालू असते. गुजरात सरकार या कालावधीत नर्मदा नदीवर एक तात्पुरता पूल उभारतात. हा पूल ओलांडून आल्यावर परिक्रमा पूर्ण होते. हा पूल चैत्र महिना संपल्यावर काढून टाकण्यात येतो. पूर्वीसारखा पाण्याचा प्रवाह चालू होतो. स्वच्छ, नितळ पाणी. या नदीत आंघोळ करू देत नाही. परिक्रमेत दोन ठिकाणी शॉवरची व्यवस्था केली आहे, तिथेच आंघोळ करू शकता, इतरत्र नाही. त्यामुळे नर्मदा नदी एकदम स्वच्छ आहे. सर्व लोकं नियमांच पालन करतात. यावेळी मनात तुलना होते, ती नर्मदा आणि चंद्रभागा या दोन्ही नद्यांची. या लोकांच्याकडून आपण काही शिकायला पाहिजे, असं मला वाटतं. आपली चंद्रभागा देखील अशीच स्वच्छ ठेवण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. नर्मदा नदीच्या या पुलावरून चालत आम्ही दुपारी तिलकवाडा येथील शंकर महाराज यांच्या मंदिरात पोहोचलो. साधारण दीड वाजले असतील. परिक्रमा पूर्ण झाल्यावर कन्यापूजनचे महत्त्व आहे. म्हणून नर्मदा किनारी रहिवासी असलेल्या लहान मुलींना बोलवून त्यांचे पाय धुवून, हळदी-कुंकू लावतात. कडा प्रसाद (शिरा) आणि दक्षिणा दिली जाते. प्रत्येक परिक्रमावासी ही प्रथा पाळतो. पण त्यामुळे या मुली प्रसादाचा कंटाळा करायला लागल्या आहेत. सध्या त्यात थोडा बदल करून उपयोगी भेटवस्तू, सुका मेवा, शालेय उपयोगी वस्तू, चप्पल अशा वस्तू दिल्या जात आहेत.



मी स्वतः ज्यावेळी जगन्नाथ कुंटे (स्वामी अवधूतानंद) यांचे धुनी पुस्तक वाचले, तेव्हा मला एक-दोन जणांनी पहिल्यांदा नर्मदे हर वाचा, असे सुचवले. धुनी वाचले, त्यावेळी मी खूप भारावून गेले होते. या पुस्तकाचं वैशिष्ट्य म्हणजे जगन्नाथ कुंटेंची पुस्तकातील भाषा एकदम सरळ, सोपी, छोटी-छोटी वाक्य असलेली. एकदा वाचायला सुरुवात केली, तर कधी एकदाचं वाचून पूर्ण करू, असं होऊन जातं. धुनीनंतर मी नर्मदे हर वाचायला घेतलं. अधाशीपणे वाचून टाकलं. पण झालं असं की, मी थोडी आतून हलल्यासारखी झाले. आतून ढवळून निघाल्यासारखं झालं. काही प्रमाणात अस्वस्थता वाटू लागली. सगळं काही निरर्थक वाटायला लागलं. जगन्नाथ कुंटेंचं नित्य निरंजन वाचायचं होतं, पण आत्ता लगेच नको. मानसिकता बदलून जाते, म्हणून सध्या नको, पुढे कधीतरी वाचू, असं मनोमन ठरवलं. आणि नर्मदा उत्तरवाहिनी परिक्रमेला निघालो. परिक्रमा पूर्ण करून घरी आल्यावर जी सुखद शांती अनुभवली, ती शब्दात मांडता येणारी नाही, मांडू शकत नाही. डोळे मिटले की त्या शांतीचा अनुभव परत-परत घेता येतोय.

कांबळे सरांनी जे सांगितलं की, परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर तुम्ही अध्यात्मात एक पायरी चढून वर अनुभव घ्याल, आणि झालंही तंतोतंत तसंच. बरं, मला एकटीलाच नाही, तर आमच्या ह्यांना आणि जे जे जाऊन आले, ते भेटले, त्या सर्वांचं हेच मत होतं की, शांतीचा सुखद अनुभव आम्ही घेत आहोत. पुस्तक वाचलं, त्यावेळी उथळ पाणी जसं खळखळ करतं, तसं वाटत होतं. सब कुछ झूठ. पण परिक्रमेहून आल्यानंतर मात्र मन शांत, स्थिर, स्वच्छ पाणी संथपणे वाहतं, तसं काहीसं झालंय. निर्विचार, निर्मोह, समाधान. पुन्हा-पुन्हा डोळे मिटावे आणि शांती अनुभवावी. कांबळे सरांनी आम्हाला पंधरा दिवसांची परिक्रमा करा, असे सुचवले आहे. पाहू या, नर्मदा मैय्या कधी बोलावते ते. हे सर्व लिहिण्याचं कारण म्हणजे पुन्हा-पुन्हा त्या शांतीचा सुखद अनुभव घ्यावा. आणि आपल्याला जो आनंद मिळाला, तो इतरांना वाटावा. आनंद वाटल्याने तो द्विगुणीत होतो, असं मला अगदी मनापासून वाटतं. ही परिक्रमा फक्त फेरी नाही, तर ही एक इनर जर्नी आहे. डोळे मिटावेत आणि त्या अनहद नादाशी एकरूप व्हावे. हा अनुभव मी परत-परत मिळवत आहे.

तसा नर्मदेचा आणि माझा ऋणानुबंध आजचा नाही. आई मध्य प्रदेशातील असल्यामुळे लहानपणापासून धामनोदला, म्हणजे महेश्वरच्या ७-८ किमी अलीकडे, जाणं होत होतं. आम्ही लहान होतो, त्यावेळी अहिल्यादेवी होळकरांच्या त्या भव्य अशा किल्ल्यात राजे रहायचे. त्यांची मुलं, म्हणजे राजकुमार, राजकुमारी फिरताना पाहिले आहेत. त्यावेळी तिथे असलेला सोन्याच्या पाळण्याची साखळी ओढून आम्ही झोका द्यायचो, पण आता खूप गर्दी वाढल्यामुळे आता लांबूनच तो झोका पहावा लागतो. नर्मदेचं पात्र पाहून, किती मोठं हे पात्र आहे, आपलं हृदय जर एतकं विशाल असतं तर, असं त्यावेळी मला वाटायचं. हे सर्व अनुभवण्यासाठी मुलांना, नातींना घेऊन आणि आईला सोबत घेऊन पुन्हा गेले. आमचा क्षत्रिय समाज महेश्वरला मोठ्या प्रमाणात आहे. माझे अनेक नातेवाईक महेश्वरला आहेत.

परिक्रमेला जाण्याअगोदर मनात अनेक शंका येत होत्या. आपण चालू शकू का? आपल्याकडून होईल का? पायी चालायची जास्त सवय नाही. जेमतेम अर्धा-पाऊण तास रोजचं सकाळचं फिरणं, इतकीच सवय होती. पण आतून मन म्हणत होतं की, आपण पायीच चालायचं. वयस्कर लोकं, काही छोटे-छोटे मुलं देखील पायी चालत होते. विशेष म्हणजे त्या भागात राहणारे लहान-लहान मुलं, भेटणाऱ्या प्रत्येक परिक्रमावासियांना नर्मदे हर, नर्मदे हर असं म्हणतात. हा संस्कार लहानपणापासून त्या मुलांवर केला जातो. तिथल्या लोकांचा सेवाभाव, नम्रपणा वाखाणण्यासारखा आहे. सेवेसाठी ही लोकं खूप तत्पर असतात. त्यांना वाटतं, कोणत्या रूपात नर्मदा मैय्या दर्शन देईल, सांगता येत नाही, म्हणून ते परिक्रमावासियांची सेवा करतात. या लोकांचा सेवाभाव, भक्तिभाव एक टक्का जरी आपल्यात उतरला, तरी आपली नर्मदा परिक्रमा सफल होईल, असे वाटते. एक विलक्षण शांतीच्या अनुभूतीचा दिव्य अनुभव, प्रसाद म्हणून घरी घेऊन आलो. पाहू या! नर्मदा मैय्या कधी बोलावते ते.

सौ. मंगल किशोर पेटकर,
संगमनेर
मो. ७५८८६९३५०२

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल देणे आहे



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर साडीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# शिबलापूरमध्ये बिबट्याचा हल्ला

## अकरा शेळ्या ठार, लाखोंचे नुकसान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील झरेकाठी ५ शिबलापूर परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. शिबलापूर-आश्वी रस्त्यावरील बोंद्रे वस्ती येथे राहणाऱ्या ६२ - वर्षीय वृद्ध महिला लहानबाई मच्छिंद्र वनवे यांच्या गोठ्यावर - बिबट्याने मध्यरात्री हल्ला केला. या हल्ल्यात १० शेळ्या आणि १ बोकड अशा एकूण ११ प्राण्यांचा जागीच मृत्यू झाला असून, त्यांचे सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

लहानबाई वनवे यांच्या पत्र्याच्या गोठ्यात १० शेळ्या, १ बोकड आणि ३ छोटी बकरी (पाठी) बांधलेल्या होत्या. बुधवारी (दि. १५) मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने गोठ्याच्या पाठीमागून असलेल्या एका अरुंद फटीतून आत प्रवेश केला. गोठा सर्व बाजूंनी बंदिस्त असल्याने बिबट्याला बाहेर पडायला जागा मिळाली नाही. शिकार करण्याच्या नादात बिबट्याने पिसाळल्यासारखा एकामागून एक सर्व १४ प्राण्यांवर हल्ला चढवला. या थरारक हल्ल्यात बिबट्याने ११ प्राण्यांच्या मानेचा घोट

घेतला, तर ३ छोटी बकरे सुदैवाने या हल्ल्यातून वाचली आहेत. हल्ल्यानंतर बिबट्याने ५ शेळ्या ओढत नेऊन जवळच असलेल्या ऊसाच्या शेतात नेल्या. या घटनेची माहिती मिळताच सरपंच प्रमोद बोंद्रे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश शिंदे आणि गावातील तरुणांनी ऊसाच्या शेतात शोधमोहीम राबवली. यावेळी त्यांना ऊसात बिबट्याचा वावर असल्याचे दिसून आले. बिबट्या समोर दिसल्याने भीतीपोटी ग्रामस्थ पुन्हा घराजवळ आले. यानंतर वनपाल सुजीत बोकडे, वनकर्मचारी सूळ, गागरे आणि शेख यांना तातडीने फोनवरून माहिती देण्यात आली. कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असले, तरी वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना येण्यास विलंब झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे परिसरात भीतीचे सावट पसरले असून शेतकरी आणि ग्रामस्थ दहशतीखाली आहेत. संबंधित बिबट्याला तातडीने पिंजरा लावून जेरबंद करावे आणि वृद्ध महिलेला नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# खासगी शाळांसाठी सरकारचा कडक इशारा

**गणवेश व साहित्य खरेदीसाठी विशिष्ट दुकान'सक्ती बंद**

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना मोठा इशारा देत महाराष्ट्र शासनाने गणवेश तसेच इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी विद्यार्थ्यांवर विशिष्ट दुकानाची सक्ती करू नये, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या संदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या आदेशानुसार शिक्षण संचालनालयाने परिपत्रक जारी करून ११ जून २००४ च्या शासन निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सरकारच्या निदर्शनास आले होते की काही शाळांकडून पालकांवर ठराविक दुकानातूनच गणवेश, वह्या, पुस्तके व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी दबाव टाकला जात आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय अधिक कठोरपणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परिपत्रकानुसार, कोणत्याही शाळेला विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातून खरेदी करण्यास भाग पाडता येणार नाही. तसेच कोणत्याही खाजगी प्रकाशनांची पुस्तके घेण्याची सक्ती देखील करता येणार नाही. राज्य मंडळ, उइडए आणि खउडए शाळांनी अनुक्रमे छउएठ किंवा डउएठ (बालभारती) यांची अधिकृत पाठ्यपुस्तकेच वापरणे बंधनकारक राहणार आहे.

या आदेशाचे उल्लंघन झाल्यास पालकांकडून तक्रारी आल्यावर शिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकारी संबंधित प्रकरणाची चौकशी करतील. दोषी शाळांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही शासनाने दिला आहे. या निर्णयामुळे पालकांवरील आर्थिक बोजा कमी होणार असून, शाळांच्या मनमानीला आळा बसणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यात दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत असून, परिणामी पाणीटंचाईच्या झळा तीव्र होत आहेत. यंदा उन्हाळा अधिक कडक असल्याने पठारभागातील विहिरी, बोअरवेल, तसेच लहान-मोठे तलाव कोरडे पडले आहेत. परिणामी अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सध्या १० गावे, ७ गावठाणे आणि २१ वाड्या-वस्त्यांना सहा टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.



सध्या दिवसेंदिवस उन्हाची तीव्रता वाढत आहे. एप्रिलच्या मध्यावर तालुक्यातील अनेक गावांत पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत.

सध्या पठारभागावरील डोळासणे, पिंपळगाव देपा, खंडेरायवाडी, खरशिंदे, चौघरवाडी, कुंभारवाडी, वरवंडी, कर्जुले पठार, गुंजाळवाडी पठार आणि पोखरी बाळेश्वर या दहा गावांसह २१ वाड्या-वस्त्यांना पंचायत समितीच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, दरेवाडी, खांबे, वनकुटे गावठाण, पाबळ पठार, नंदाळे पठार आणि गांगडवस्ती या भागांतूनही टँकर सुरू करण्यासाठी प्रस्ताव दाखल झाले असल्याचे वरिष्ठ टंचाई कक्ष प्रमुख संजय आरगडे यांनी सांगितले.

नागरिकांनी पाण्याचा वापर जपून आणि काटकसरीने करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गावोगावी जलजीवन मिशन योजनांची कामे अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. ती वेळेत पूर्ण झाली असती, तर काही गावांना टँकरची गरज भासली नसती. नुकतीच आमदार अमोल खताळ यांच्या उपस्थितीत पाणीटंचाई आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यात तालुक्यातील टंचाईचा आढावा घेण्यात आला होता. सध्या सुमारे १५ हजार ९४ लोकसंख्या असलेल्या पठार भागासाठी प्रशासनाकडून ६ टँकर कार्यरत ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासन सतर्क झाले आहे.

# ५० हजारांची मागणी; वन अधिकारी तुरूंगात

ठाणे (वृत्तसंस्था)

सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार कमी होताना काही दिसून येत नाही, सर्वसामान्य नागरिकांना आजही आपल्या हक्काच्या कामासाठी लाल फितीत अडकलेल्या कागदपत्रांसाठी पैसे मोजावे लागतात. त्यामुळेच, गेल्या काही महिन्यांत लाच लुचपत विभागाने धाडी टाकून अनेक अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या आहेत. आता पुन्हा एकदा ठाणे जिल्ह्यात एसीबीने कारवाई करत दोघांना अटक केली आहे. ना हरकरत प्रमाणपत्रासाठी ५० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या वनपाल आणि वनसंरक्षकास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. विलास सानप आणि रेखा गायकवाड अशी लाचखोर दोघांची नावे आहेत. दरम्यान, गेल्याच आठवड्यात परभणी जिल्ह्यात दोन लाचखोर सरकारी अधिकाऱ्यांनी अटक करण्यात आली होती.

तक्रारदाराने नवीन पेट्रोलपंप उघडायचा असल्याने वनविभागाकडे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केली होती. त्यावेळी, ना हरकत प्रमाणपत्रासाठी विलास सानप यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. मात्र, लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक ठाणे विभागाकडे तक्रार केली होती. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीनंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तक्रारदार आणि आरोपींमध्ये चर्चेअंती २५ हजारांच्या लाचेची रक्कम ठरवण्यात आली, लाच देण्यासाठी तक्रारदार वन परिक्षेत्रीय अधिकारी वन परिमंडळ अधिकारी येथे गेले असता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी देखील सापळ रचून होते. त्यामुळे, वन विभागातील अधिकारी विलास सानप आणि रेखा गायकवाड यांना लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. या प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अधिक तपास करत असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग • किडनी विकार
• मधुमेह व हृदयरोग • मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• दमा व श्वसनाचे विकार • सर्पदंश व विषबाधा
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार • बालरोग चिकित्सा विभाग
• जनरल सर्जरी • प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया • संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25